# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०१/२०२५ (सोमवार) सायंकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :–दिनांक २७/०१/२०२५ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वारेगाव कन्हान नदी शिवार येथे ट्रक द्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा वारेगाव कन्हान नदी शिवार येथे ट्रक क्र. एम एच–३१/जी बी– २७५४ चे चालकास थांबण्याचा इशारा केला असता वाहन घटनास्थळावर सोडुन पळुन गेला. स्टाफ यांनी सदर वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रकमधुन १) ०२ ब्रास रेती किंमती १०००० /– रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच–३१/जी बी– २७५४ किंमती ५०००००/–रू असा एकुण ५१००००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून अज्ञात आरोपी चालक याचेविरूद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.स. सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. १९५७ सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहींता १९६६, सहकलम ३ सार्वजनिक नुकसान प्रति. अधि. सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर